# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/11/2022 (बुधवार) दुपार

---

### दुखापत

**१) पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील बंडूच्या पानठेल्या समोर गहूहीवरा येथे दिनांक २९/११/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- श्रीराम पामाजी मेश्राम, वय ५० वर्ष, गहूहीवरा वार्ड क्र ०२ कन्हान, ता.पारशिवनी हा आपल्या मित्रा सोबत नमुद घटनास्थळी बसला असता यातील आरोपी नामे- प्रकाश बाबूराव साबरे, वय ५५ वर्ष, रा. गहूहीवरा याने नमुद घटनास्थळी येवून फिर्यादीला विनाकारण शिवीगाळ करून फिर्यादीचे डोक्यावर स्टीक (काठी) ने मारून जखमी करून फिर्यादीच्या पत्नीला सूध्दा शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जैलाल सहारे ब. नं. १६८ पोलीस स्टेशन कन्हान मो. नं. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे.काटोल** :- अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा झिलपा येथे दिनांक २८/११/२०२२ चे १९.०० वा.ते १९.१० वा. चे सुमारास फिर्यादी नामे- मनोहर अर्जुनराव लाड, वय ४२ वर्ष, रा. झिलपा, तह. काटोल व आरोपी नामे- पवन धुर्वे, रा. झिलपा, तह. काटोल हे एकाच गावात राहत असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी यांने आरोपीला उधारीचे पैसे मागीतले असता आरोपीने शिवीगाळ करून डाव्या हाताचे बोटाला चावा घेतला व रक्त निघुन जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मो. नं. ९५११८३४७५४ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर